कृषि विभाग, जिल्हापरिषद,गडचिरोली
दुरध्वनी क्रमांक (07132)222312
email :- adozpgad@gmail.com

जा.क्रमांक/जिपग/कृषि/स्था-1/1328/2024, दिनांक :- 10 /06/2024

महत्वाचे

प्रति,

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

**विषय:- विस्तार अधिकारी (कृषि) पदाकरीता सरळसेवा पदभरती-2023 संबंधाने दिनांक /06/2024 रोजी मुळ कागदपत्राचे पडताळणी करीता उपस्थित राहणेबाबत.**

संदर्भ:- 1. आयबिपीएस कंपनी कडुन प्राप्त, विस्तार अधिकारी (कृषि) संवर्गाची एकत्रीत गुणवत्ता यादी.
2. जिल्हा निवड समितीची बैठक दिनांक - 07/06/2024 मधील निर्देश.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने शासन निर्णय दिनांक 15 मे 2023 मधील निर्देशानुसार, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत मंजुर, **विस्तार अधिकारी (कृषि)** या पदाकरीता सरळसेवा भरती 2023 नुसार जाहीरात प्रसिध्द करुन आयबीपीएस कंपनीकडुन ऑनलाईन पध्दतीने **दिनांक** 10.10.2023 रोजी परिक्षा घेण्यात आलेली आहे. सदर परिक्षेचे निकाल जाहिर करण्यासंबंधाने आयबिपीएस कंपनी कडून विस्तार अधिकारी (कृषी) पदाची एकत्रीत गुणवत्ता यादी या कार्यालयास प्राप्त झालेली असुन प्राप्त गुणवत्ता यादीमध्ये आपले नांव समाविष्ठ आहे. करीता आपण परिक्षेचे ऑनलाईन अर्ज सादर करतांना अपलोड केलेल्या दस्ताऐवजांच्या **मुळ प्रती** तसेच साक्षांकित केलेल्या **(दोन संच)** प्रतीसह दिनांक --20/06/24-- रोजी सकाळी 11.00 वाजता **विर बाबुराव शेडमाके सभागृह जिल्हा परिषद, गडचिरोली** येथे न चुकता उपस्थित रहावे.

उक्त दिनांकास कागदपत्रे तपासणी करीता गैरहजर असल्यास आपणास निवड प्रक्रियेसंबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

**सहपत्र:**- सोबत-कागदपत्रांची यादी.

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली.**

**प्रतिलीपी:-**

1. मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
2. सदस्य- सचिव, जिल्हा निवड समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.प्र.) जि. प. गडचिरोली यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेपित.
3. सदस्य जिल्हा निवड समिती तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेपित.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली.**

# कृषि विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली

दुरध्वनी क्रमांक (07132)222312 ) | email :- adozpgad@gmail.com


**जिल्हा परिषद, गडचिरोली सरळसेवा भरती प्रक्रिया 2023 अंतर्गत विस्तार अधिकारी (कृषि) पदासाठी उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेवून यावयाची कागदपत्रे.**

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1. | संकतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट व परिक्षाशुल्क भरणा केल्याची पावती. |
| 2. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा प्रमाणपत्र |
| 3. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा सर्व मुळ शैक्षणिक कागदपत्रे |
| 4. | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. परंतु कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषि विषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पध्दतीने व्यवसायाचे ज्ञान व ग्रामीण अनुभव असेल अशा उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. 1. बी.एस.सी..(ऑनर्स) उद्यानविद्या. (2) बी.एस.सी.(ऑनर्स) वनविद्या. (3) बी.एस.सी. (ऑनर्स) सामाजिक विज्ञान, (4) बी.एफ.एस.सी. (मत्स्य विज्ञान), (5) बि.टेक (कृषि अभियांत्रिकी), (6) बी. टेक (अन्न तंत्रज्ञान) (7) बी.टेक (जैव तंत्रज्ञान ), (8) बी.एस.सी. (एबीएम)/बी.बी.एम. (कृषि) / बी.बी.ए.(कृषि) /बी.एस.सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन. |
| 5. | जन्माचा पुरावा. |
| 6. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र. |
| 7. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या 865 गावातील मराठी भाषीक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला. |
| 8. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |
| 9. | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र. |
| 10 | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |
| 11 | ओळखपत्र (आधारकार्ड / वाहन परवाना / राज्य निवडणुक आयोगाचे ओळखपत्र / पासपोर्ट / राष्ट्रीयकृत बँकेचे खातेपुस्तक / पॅन कार्ड) (नावात बदल असु नये) |
| 12 | उक्त पदाच्या अनुषंगाने जाहीरातीत नमुद सेवा प्रवेश नियम, अटी व शर्ती नुसार आवश्यक कागदपत्रे. |

| | | |
|---|---|---|
| (आयुषी सिंह, भा.प्र.से) | (शेखर एम.शेलार) | (प्रदिप झोडे तुमसरे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) | कृषि विकास अधिकारी |
| जिल्हा परिषद,गडचिरोली | जिल्हा परिषद,गडचिरोली | जिल्हा परिषद,गडचिरोली |